पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२८/२०१४
दिनांक : ०८/०१/२०१४

प्रति,

मा. ..................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/०१/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत...

मा.महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी-२०१४ ची मासिक मा.महापालिका सभा सोमवार दिनांक २०/०१/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. कृपया सदर सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.</u>**

**सूचना**

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये)

**<u>कार्यपत्रिका क्रमांक २५</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी-२०१४ ची मासिक मा.महापालिका सभा सोमवार दिनांक २०/०१/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

--------------

मा.महापालिका सभा क्र.२३ दि.२०.११.२०१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

--------------

**<u>मा.स्थायी समितीचे ठराव</u>**

**विषय क्रमांक १) संदर्भ – १)** मा.सुषमा तनपुरे व मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.
**२)** मा.स्थायी समिती सभा ठ.क्र. ५४८० दि.३१/१२/२०१३

"नादब्रम्ह परिवार" ही संस्था संगीताचा प्रचार प्रसार करीत असून १९ वा वार्षिक मास्टर दिनानाथ मंगेशकर संगीत नाटय महोत्सव दिनांक २ ते ५ जानेवारी २०१४ दरम्यान आयोजित करण्यास व त्याकामी र.रु. २,९५,०००/- अनुदान मंजूर करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक २) संदर्भ – १)** मा.सुषमा तनपुरे व मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.
**२)** मा.स्थायी समिती सभा ठ.क्र. ५४८२ दि.३१/१२/२०१३

साने गुरुजी कथामाला ४७ वे अधिवेशन फुलगांव येथील लोकसेवा प्रतिष्ठान संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिक विद्यालयाच्या प्रांगणात होणार असून मनपा तर्फे सदर अधिवेशनास र.रु.२,९५,०००/- (अक्षरी र.रु. दोन लाख पंच्याण्णव हजार) अनुदान मंजूर करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

## <u>मा.विधी समितीचे ठराव</u>

**विषय क्रमांक ३)** संदर्भ:-१) मा.शैलजा शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१८५ दि.३/१/२०१४

मनपाच्या ड प्रभागातील उद्यानांची किरकोळ दुरुस्ती विषयक व लहान मोठी विकासाची कामे करणे या कामासाठी मनपाच्या सन २०१३-१४ च्या भांडवली खर्चाच्या अंदाजपत्रकामध्ये पान क्र.४५४, अनु.क्र.३० वर स्थापत्य उद्याने या लेखाशिर्षकाअंतर्गत र.रु.१५,००,०००/- तरतूद आहे. पिंपळे गुरव येथील आरक्षण क्र.३५२ राजमाता जिजाऊ उद्यानासाठी बुरुज व तटबंदीचा समावेश असलेले मुख्य प्रवेशद्वार बांधणेसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,००,००,०००/- अपेक्षित आहे. या कामासाठी आवश्यक र.रु.१,००,००,०००/-(अक्षरी र.रु.एक कोटी फक्त) च्या रक्कमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ४)** संदर्भ:-१) मा.शैलजा शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१८६ दि.३/१/२०१४

पिंपळे गुरव येथील हॉटेल सृष्टी समोरील जागेत उद्यान विकसीत करणे या कामासाठी मनपाच्या सन २०१३-१४ च्या भांडवली खर्चाच्या अंदाजपत्रकामध्ये पान क्र.४६५, अनु.क्र.११४ वर स्थापत्य उद्याने या लेखाशिर्षका अंतर्गत र.रु.४५,००,०००/- तरतूद आहे. या कामासाठी स्थापत्य विभागामार्फत र.रु.१,८०,००,०००/- ची निविदा काढणेत आली आहे. तथापि ३ एकर जागेवर संपूर्ण उद्यानाचे आरक्षण विकसीत करणेसाठी अंदाजे र.रु.५,००,००,०००/- चा खर्च अपेक्षित आहे. या कामासाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रु.५,००,००,०००/- मधून र.रु.१,८०,००,०००/- वजा जाता उर्वरित र.रु.३,२०,००,०००/-(अक्षरी र.रु.तीन कोटी वीस लाख फक्त) च्या रकमेस प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ५)** संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/ड.मु./१/कावि/२४७६/२०१३, दि.०९/१२/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१८८ दि.३/१/२०१४

थेरगाव गावठाण रस्ता विकसीत करणेकामी येणा-या र.रु.१,८७,५०,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी सत्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ६)** संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नावियो/५/कावि/१७७/२०१३, दि.२६/१२/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१९० दि.३/१/२०१४

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ज्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये काही योजना बंद करणे, काही योजनांमध्ये सुधारणा करणे व नविन योजना सुरु करणे प्रस्तावित असून अपंग कल्याणकारी योजनेतील विविध कल्याणकारी योजनेमध्ये सुधारित बदल करणेकामी प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ नुसार अ.क्र.१ ते २ योजनांना मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ७)** संदर्भ:- १) मा.प्रशांत शितोळे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव -
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१९३ दि.३/१/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी श्री.संभाजी भिमा शिंदे, सफाई कामगार, विभाग – पोस्टमार्टेम वायसीएम हॉस्पिटल, पिंपरी व या विभागाच्या कर्मचा-यांबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार (रिट पिटीशन क्रमांक २८८१/२०१२) कामकाज व्हावे व त्याप्रमाणे सदर व इतर पात्र कर्मचा-यांस पदाप्रमाणे नेमणूक व्हावी याकरीता सदर प्रस्ताव मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा अशी शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ८)** संदर्भ:- १) मा.शैलजा शितोळे, मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१९४ दि.३/१/२०१४

प्र.क्र.५३ मधील पश्चिम बाह्यवळण मार्गावरील स.नं. १५६ पासून वाकडकर वस्तीकडे जाणारा १८.०० मी. डी.पी.रस्ता विकसित करणे या कामाच्या नावाचा महानगरपालिकेच्या मंजूर अर्थसंकल्पामध्ये समावेश नाही. सदर कामाचे सन २०१३-१४ च्या मनपाच्या सुधारित अर्थसंकल्पात व्हिजन २००५ या लेखाशिर्षाअंतर्गत समावेश करुन आवश्यक तरतूद उपलब्ध करणेच्या कार्यवाहीस अधिन राहून सदर कामाचे अंदाजपत्रकीय र.रु.३,०५,२२,०००/-(अक्षरी र.रु.तीन कोटी पाच लाख बावीस हजार फक्त) प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

## मा.महिला व बालकल्याण समितीचे ठराव

**विषय क्रमांक ९)** संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नावियो/०३/कावि/१६१/२०१३, दि.३०/१२/२०१३
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठ.क्र.१७ दि.८/१/२०१४

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ज्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये काही योजना बंद करणे, काही योजनांमध्ये सुधारणा करणे व काही नविन योजना सुरु करणे

प्रस्तावित असून महिला व बालकल्याण योजनेतील विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुधारित बदल करणेकामी प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ नुसार अ.क्र.१ ते १० योजनांना मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्रमांक १०)** संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३, दि.०४/०९/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवाडी, म्हाळुंगे, मोई,मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत शासनास मनपाचे अभिप्राय सादर करणेपूर्वी सर्व पदाधिकारी यांची बैठक दि.३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात घेण्यात आली. सदर बैठकीत मनपा हद्यीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील ६ गावे मनपा हद्दीत समावेश करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली आणि सदर हद्दवाढीचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर करणेबाबत चर्चा झाली तथापि सद्यःस्थितीत मनपा हद्दीला लागून असलेली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणे योग्य होईल. त्यानुसार खालील नमुद मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवाडी, माण, नेरे, सांगवडे ही मनपा हद्दीला लागून असलेली एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ११)** संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३, दि.०७/१०/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आणि मनपा हद्दीला लागून असलेली ७ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चीमेकडील ७ गांवे अशी एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव मान्यतेकामी पुढील प्रमाणे आहे. मनपा हद्दी समाविष्ट करावयाचे गांवे- मनपा हद्दीच्या उत्तरे कडील ७ गावे- आळंदी , चिंबळी ,कुरुळी , मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर. मनपा हद्दीच्या पश्चीमे कडील ७ गांवे- हिंजवडी,जांबे,माण,मारुंजी,नेरे,गहुंजे,सांगवडे वरीलप्रमाणे प्रस्ताव पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दिनांक ४/९/२०१३ अन्वये मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला आहे. प्रस्तुत विषयी मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांनी दि.१०/०९/२०१३ च्या पत्राने खेड तालुक्यातील आळंदी, चाकण, मोई, कुरुळी, निघोजे, चिंबळी, केळगांव, सालुंब्रे, महाळुंगे, खराबवाडी ,नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, कडाचीवाडी या गावांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समावेश होणेबाबत विरोध केला असल्याचे आणि सदर गांवे मनपा हद्दीत समावेश करु नये असे नमूद केले असून त्यासोबत ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत जोडली आहे. प्रस्तुत विषय मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला असल्याने या विषयासोबत मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांचे पत्र व त्यासोबतचे सहपत्रे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेची शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १२)** संदर्भ:-१) मा.प्रतिभा भालेराव, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

२) मा.प्रशासन अधिकारी, अ प्रभाग यांचे पत्र क्र. अप्र/स्विस/११/कावि/४१५/२०१३ दि.१९/११/२०१३

३) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४९ दि.१८/१२/२०१३

अ प्रभाग समिती सभा दिनांक ०९/१०/२०१३ ठराव क्रमांक १९६ नुसार प्रभाग क्र.१६ मध्ये जय-गणेश व्हिजन या संस्थेने महापालिकेस ओपन स्पेसचे माध्यमातून दोन एकर जमीन ताब्यात दिली असून ती जमीन मनपाचे ताब्यात आहे. सदर जागेचा आरक्षण क्र.१७१ आहे व ती एल आकाराची आहे. प्रस्तुत जागेपैकी एक एकर जागेमध्ये खेळाचे मैदान विकसित करणेस व एक एकर जागेमध्ये गार्डन विकसीत करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १३)** संदर्भ:-१) मा.शांताराम भालेकर, मा.उषा वाघेरे यांचा प्रस्ताव -

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.५० दि.१८/१२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे दिघी येथील आ.क्र. २/१२० प्राथ.शाळा म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने मौजे दिघी येथील आ.क्र.२/१२० प्राथ.शाळा ज्या ठिकाणी आरक्षित केलेली आहे त्यापासून ३०० मी. अंतरावर खाजगी शाळा आहे. त्यामुळे सदर आरक्षणाची आवश्यकता नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर आरक्षण म.प्रा.न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १४)** संदर्भ:-१) मा.शांताराम भालेकर, मा.उषा वाघेरे यांचा प्रस्ताव -

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.५१ दि.१८/१२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे दिघी येथील आरक्षण क्र.२/११६ प्राथ.शाळा व आरक्षण क्र.२/११९ खेळाचे मैदान म.प्रा.न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये बदलणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने प्रस्तावीत दोन्ही आरक्षण म.प्रा.न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

## <u>समित्यांचे अहवाल</u>

## <u>मा.विधी समिती</u>

**विषय क्रमांक १५) अ)** दिनांक १५/११/१३, ६/१२/१३ व ९/१२/१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

**ब)** दिनांक ६/१२/१३ व ९/१२/१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

## **मा.महिला व बालकल्याण समिती**

**विषय क्रमांक १६) अ)** दिनांक २३/१०/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

**ब)** दिनांक १३/११/२०१३, २२/११/२०१३, २७/११/२०१३, ११/१२/२०१३ व २६/१२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

## **मा.शहर सुधारणा समिती**


**विषय क्रमांक १७) अ)** दिनांक २०/११/१३ व २२/११/१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

**ब)** दिनांक ४/१२/१३ व १०/१२/१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

## **मा.क्रिडा समिती**

**विषय क्रमांक १८) अ)** दिनांक २०/११/२०१३, २६/११/२०१३, ४/१२/२०१३ व ६/१२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

**ब)** दिनांक ४/१२/१३ व ६/१२/१३ चा सभावृत्तांत कायम करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२८/२०१४
दिनांक : ०८/०१/२०१४

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

माहे जानेवारी २०१४ चे मा.महापालिका सभेमध्ये मा.प्रशांत शितोळे यांस विचारावयाचे प्रश्न -

---

प्रश्न १) महापालिकेने सन २००७-०८, ०८-०९, ०९-१०, १०-११, ११-१२, १२-१३, १३-१४ या सर्व आर्थिक वर्षांबाबत खालील माहिती वर्षनिहाय व तुलनात्मक तक्ता करुन आकडेवारीसह मिळावी.

ख) सदर आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक किती ?

ग) सदर वर्षी मनपाचा एकूण उत्पन्नाचा अंदाज किती होता ?

घ) सदर वर्षी मनपाचे अंदाज केल्यानुसार उत्पन्न प्राप्त झाले कां ?

ङ) सदर वर्षामध्ये विकास कामांकरिता एकूण किती तरतूद करण्यात आली होती ?

च) सदर वर्षामध्ये चालू कामांवर किती रक्कम खर्च झाली ?

छ) सदर वर्षामध्ये नवीन कामांकरिता किती रक्कम खर्च झाली ?

ज) सदर वर्षाचा आस्थापना खर्च किती ?

झ) सदर वर्षी महापालिकेने कर्ज घेतले होते कां? असल्यास किती व कोणत्या संस्थेकडून ?

ञ) सदर वर्षी जे.एन्.एन्.यू.आर्.एम्.योजनेत मनपास मंजूर झालेली रक्कम किती ?

ट) सदर वर्षी जे.एन्.एन्.यू.आर्.एम्.च्या कामांकरिता किती रक्कम खर्च झाली ?

ठ) सदर वर्षी जे.एन्.एन्.यू.आर्.एम्.च्या प्रकल्पांना किती रक्कम देय होती ?

ड) सदर वर्षी मनपाच्या मुख्यालयांतून होणाऱ्या कामासाठी एकूण तरतूद किती ?

ढ) सदर वर्षी मनपाच्या मुख्यालयांतून होणाऱ्या कामासाठी प्रत्यक्ष खर्च किती झाला ?

ण) सदर वर्षी मनपाच्या मुख्यालयांतून होणाऱ्या नव्या कामांसाठी तरतूद किती ?

त) सदर वर्षी मनपाच्या नवीन कामांकरिता खर्ची पडलेली रक्कम किती ?

थ) सदर वर्षीच्या मनपाच्या अंदाजपत्रकांतील आस्थापना खर्चाच्या व्यतिरिक्त इतर कामांसाठी केलेल्या खर्चाची टक्केवारी किती ?

द) सदर वर्षी मुख्यालयांतून खर्ची पडलेल्या स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, जलनि:सारण या विभागांतील प्रत्यक्ष खर्च किती ?

ध) सदर वर्षी प्रभाग स्तरावरील तरतूद किती व किती रक्कम खर्ची पडली ?

न) सन २०१३-१४ मधील ३१ डिसेंबर २०१३ पर्यंत विकासकामांकरिता किती रक्कम खर्ची पडली ?

ऩ) सन २०१३-१४ मध्ये ३१ डिसेंबर २०१३ पर्यंत सर्व विभागाच्या नवीन कामांकरिता एकूण किती रक्कम खर्च झाली ?

प) सदर वर्षी मनपाचे जकात, करसंकलन, बांधकाम परवानगी, पाणीपुरवठा, आकाशचिन्ह परवाना या विभागांचे प्रत्यक्ष उत्पन्न किती होते व विभागाचा अपेक्षित अंदाज काय होता ?

प्रश्न २) सन २०१३-१४ मध्ये मा.आयुक्त यांनी जाहीर केलेल्या पर्यटन विकास आराखड्याकरिता पवना सुधार प्रकल्पासह अंदाजे खर्च किती आहे व सदर खर्च किती वर्षांमध्ये केला जाणार आहे ?

माहे जानेवारी २०१४ चे मा.महापालिका सभेमध्ये मा.उल्हास शेट्टी यांस विचारावयाचे प्रश्न -

---

प्रश्न ३)

अ) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम १४३ नुसार बांधकाम अनुज्ञेय पेक्षा १०% अधिकचे अनाधिकृत किंवा विनापरवाना बांधकाम केलेल्या बांधकामांना दंडात्मक कारवाई करुन (Compounding fees) आकारुन नियमित करण्याचे धोरण केव्हा अंमलात आणले होते?

ब) त्यास आयुक्तांनी किंवा मनपाने मान्यता दिली होती काय? दिली असल्यास केव्हा पासून ?

क) हे धोरण राबवित असताना सदरच्या कार्यकाळात किती बांधकामांना परवानगी दिली व नियमित केली व किती दंड आकारला व दंडापासून पालिकेला किती उत्पन्न मिळाले? सदरचे धोरण सध्या चालू आहे किंवा बंद आहे. बंद असल्यास कोणत्या आदेशान्वये बंद करण्यात आले अथवा कोणत्या सक्षम समितीची मान्यता घेतली? कोणतेही धोरण, आदेश, परिपत्रक, फतवा किंवा नियम लागू करणेपूर्वी जाहीर प्रकटन द्यावे लागते याबाबतीत जाहीर प्रकटन दिले होते का? तसेच या धोरणाची कालमर्यादा किती सालापर्यंत होती? व त्याची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने केली का? अथवा आदेशाच्या दिनांकापासून केली का?

अनाधिकृत / विनापरवाना बांधकामाची मिळकतकर नोंदणी कोणाच्या आदेशान्वये व कोणत्या दिनांकापासून अंमलबजावणी करण्यात आली व सदरचे आदेश कोणी पारीत केले?

प्रश्न ४)

अ) बी.आर.टी. कॉरीडॉरमध्ये आज पर्यंत किती बांधकाम परवानग्या दिल्या, झोन दाखले दिले, विकास योजना अभिप्राय ची मागणी झाली या सर्वांचा तपशील

दि. १.४.२०१० ते दि. ३१.३.२०११
दि. १.४.२०११ ते दि. ३१.३.२०१२
दि.१.४.२०१२ ते दि. ३१.३.२०१३
दि.१.४.२०१३ ते आज अखेरपर्यंत

ब) बी.आर.टी. कॉरीडोरमध्ये दि.१.३.२०१० ते आजपर्यंत किती चौरस फूट विकास हस्तांतर हक्क (टी.डी.आर.) वापर अनुज्ञेय केले व ते कोणकोणत्या झोनमध्ये करण्यात आले व कोणकोणत्या झोनमधून विकास हस्तांतर हक्काची (टी.डी.आर.) निर्मिती करण्यात आली.

क) महापालिकेच्या अंदाजपत्रकानुसार एकुण किती बी.आर,टी. कॉरीडॉरमध्ये मनपास किती उत्पन्न अपेक्षित होते व प्रत्यक्षात किती मिळाले यांची माहिती सन १ एप्रिल २०१० पासून आज अखेर आर्थिक वर्षानुसार मिळावी व सध्याचे धोरण काय आहे?

ख) बी.आर.टी. कॉरीडोर धोरणाची अंमलबजावणी परिणामकारकरित्या न केल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले व शहराचा विकास खुंटला याबद्दल मा.आयुक्तांचे काय मत आहे. तसेच सध्या एल.बी.टी. लागू झाल्यामुळे महापालिकेचे उत्पन्न कमी झाल्यामुळे इतर नविन उत्पन्नाचे मार्ग शोधण्याबाबत काय प्रयत्न करण्यात आले?

माहे जानेवारी २०१४ चे मा.महापालिका सभेमध्ये मा.सिमा सावळे यांस विचारावयाचे प्रश्न -

प्रश्न ५) पिंपरी चिंचवड महापालिकेतील बिआरटी कॉरिडॉरमध्ये विकसन करताना युटीएफ फंड यामध्ये दि.०३.०३.२०१० पासून दि.०३.०१.२०१४ पर्यंत महापालिकेच्या अंदाज पत्रकानुसार एकुण किती रक्कम जमा होणे अपेक्षित होते व प्रत्यक्षात एकुण किती रक्कम जमा झाली? अपेक्षित व जमा रक्कमेचा तपशील वर्ष व लेखाशिर्ष निहाय द्यावा.

प्रश्न ६) पिंपरी चिंचवड महापालिकेतील बिआरटी कॉरिडॉरमध्ये दि.०३.०३.२०१० पासून ते दि.०३.०१.२०१४ पर्यंत एकुण किती नागरीकांनी झोन दाखले व विकास योजना अभिप्राय मागीतले? तपशील वर्ष व शिर्ष निहाय द्यावा. तसेच दि.०३.०३.२०१० पासून ते दि. ०३.०१.२०१४ पर्यंत बिआरटी

कॉरिडॉरमध्ये एकुण किती बांधकाम परवानग्या दिल्या आहेत? तपशील वर्ष निहाय द्यावा.

प्रश्न ७) बिआरटी कॉरिडॉरमध्ये दि.०३.०३.२०१० पासून ते दि.०३.०१.२०१४ पर्यंत एकुण किती चौ.फुट विकास हस्तांतरण हक्काचे वापर अनुज्ञेय करण्यात आला? तपशील वर्ष निहाय द्यावा. तसेच दि.०३.०३.२०१० पासून ते दि.०३.०१.२०१४ पर्यंत बिआरटी कॉरिडॉरमध्ये अनुज्ञेय करण्यात आलेले विकास हस्तांतरण हक्क हे कोणत्या झोनमधुन व किती चौ.फुट निर्माण झाले होते? तपशील वर्ष, अ / ब / क झोन / वाढीव हद्दीतील विकास हस्तांतरण हक्क आणि चौ.फुट निहाय द्यावा.